क्र.२/नसचि/प्रशासक/ ०३/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १३ आक्टोंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०३/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या बेडग रोड येथील कचरा डेपो मध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाची स्थळ पहाणी करणे व पुढील कामकाजाचे नियोजन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेकरिता **सोमवार दि.१६/१०/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता महापालिकेचा बेडग रोड कचरा डेपो** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या सर्वच कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांना महापालिका दवाखान्याकडून मोफत औषधोपचार सुविधा देणेबाबत निर्णय घेणे.

३. महापालिकेच्या बेडग रोड येथील कचरा डेपो मध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाची स्थळ पहाणी करणे व पुढील कामकाजाचे नियोजन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४ दिनांक :- १६/१०/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.०३ दि.१६/१०/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह,सांगली येथे सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज
३.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली	४.	श्रीमती स्मृती पाटील – उपायुक्त,मिरज
५.	श्री.वैभव साबळे –उपायुक्त, कर	६.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता
७.	श्री.सुशिलकुमार केंबळे - लेखापाल	८.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
९.	श्री.रविंद्र ताटे – आरोग्याधिकारी,मिरज	१०.	श्री.विनय झगडे – सहा.संचा.नगररचना
११.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड	१२.	श्री.अशोक माणकापुरे- प्रशासकीय अधिकारी
१३.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी, (आस्था.)	१४.	श्री.नितीन शिंदे- मालमत्ता व्यवस्थापक/कर निर्धारक,संकलक
१५.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,सांगली	१६.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त,प्र.स.क्र.१
१७.	श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२	१८.	श्रीमती उज्वला शिंदे – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३
१९.	श्री.अनिस मुल्ला – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४	२०.	श्री.आप्पा हलकुडे - नगर अभियंता,सांगली
२१.	श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि.	२२.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता
२३.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष	२४.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
२५.	श्री.धनंजय हर्षद- जनसंपर्क/विधी अधिकारी	२६.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर
२७.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी	२८.	श्री.विनायक जाधव-ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,मिरज
२९.	श्री.वैभव बाघमारे – नगररचनाकार,सांगली	३०.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.
३१.	श्री.चरण कोल्हे- सहा.आयुक्त	३२.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक
३३.	श्री.अमजद जेलर – क्रिडा अधिकारी	३४.	श्री.मुलाणी - पा.पु. सांगली

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

प्रशासक मी सर्वांचे स्वागत करतो आज महासभा बेडग कचरा डेपो येथे घेणेचा उद्देश म्हणजे कचरा डेपो येथे किती व कशाप्रकारे काम झाले आहे हे सर्वांना माहिती व्हावी यासाठी इथे सभा आयोजित केली आहे. दि.२४ ऑगस्ट पासून माझ्याकडे प्रशासकाचा कार्यभार मिळाला आहे. महासभा, स्थायी समितीचे अधिकार प्रशासकांना आले. आम्ही दर सोमवारी प्रशासक सभा घेतो. सभेमध्ये सर्व अधिकारी चर्चा करतात व त्यानुसार आम्ही ठराव करतो. त्यामुळे जे निर्णय होतात ते निर्णय सर्व अधिकाऱ्यांना माहिती होतात.

आम्ही कचरा निर्मुलनाचे केलेले काम सर्वांना माहिती व्हावी यासाठी येथे सभा घेतली व सर्व पत्रकारांनाही येथे बोलाविले आहे. आत्ता जुन्या कचऱ्याचे काम झाले आहे. दुसऱ्या टप्प्यात नविन कचऱ्याचे काम होणार आहे. आम्ही केलेल्या कामाची व्हिडिओ क्लीप केलेली आहे ती आपण सर्वांनी पहावी.

(कचरा निर्मुलनाबाबतची तयार केलेली ध्वनी चित्रफीत सर्वांना दाखविणेत आली.)

विषय क्र. ०१ मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/१०/२०२३ रोजीचे सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या सर्वच कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांना महापालिका दवाखान्याकडून मोफत औषधोपचार सुविधा देणेबाबत निर्णय घेणे.

वैद्यकिय आरोग्याधिकारी मनपा च्या बदली मानधन रोजंदारी या कर्मचाऱ्यांना व त्यांचे नातेवाईक यांना महापालिकेच्या दवाखान्यामध्ये वैद्यकिय सुविधा मोफत देणेबाबतचा विषय आहे.

प्रशासक महापालिकेमध्ये काम करणारे मानधन बदली रोजंदारी कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांना मोफत वैद्यकिय सुविधा देणेत येणार आहे यापुर्वी फक्त कायम कर्मचाऱ्यांना मोफत सेवा देत होते. आता सर्वांना फायदा होईल. विषय मंजुर

विषय क्र. ०३ महापालिकेच्या बेडग रोड येथील कचरा डेपो मध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाची स्थळ पाहाणी करणे व पुढील कामकाजाचे नियोजन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

प्रशासक आपण प्रथम घनकचरा व्यवस्थापनांतर्गत आम्ही केलेल्या कामाची व्हिडीओ क्लीप पाहू व त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर जावून केलेल्या कामाची पाहणी करु. आपणास माहित आहे यापुर्वी कचरा डेपो मध्ये कोणीही येत नव्हते. नागरीकांनी कचरा डेपोबाबत वेळोवेळी आंदोलने केली होती. समडोळी व बेडग रोड वरील नागरिकांना त्रास होत होता. तो आता संपणार आहे. कचरा डेपो येथे पर्यटन स्थळ व्हावे इतपत आम्ही काम करणार आहे.

कचरा निर्मुलनाबाबतची तयार केलेली ध्वनी चित्रफीत सर्वांना दाखविणेत आली. व त्यानंतर कचरा डेपोमध्ये केलेल्या कामाची व चालू असलेल्या कामाची सर्वांनी स्थळ पाहाणी केली.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- १६/१०/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १० **दिनांक :- १६/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/१०/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०६ ते ठराव क्र.०९ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ११ **दिनांक :-** १६/१०/२०२३

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०६/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिकेमध्ये कायम,मानधन,रोजंदारी बदली कामगार इत्यादी कर्मचारी काम करीत आहेत. सदरचे सर्व कर्मचारी यांना महापालिकेमार्फत देणेत येणाऱ्या सर्व प्रकारच्या आरोग्य विषयक वैद्यकिय सेवा मोफत देणेबाबत महापालिकेच्या महापालिका कामगार सभा या कामगार संघटनेच्या वतीने मागणी करणेत आलेली आहे.

सद्या महापालिकेमधील कार्यरत असणाऱ्या कायम कर्मचारी यांना महापालिकेच्या वैद्यकीय केंद्रामार्फत देणेत येणाऱ्या सेवा मोफत दिल्या जातात. तथापि, मानधन, रोजंदारी, बदली कर्मचारी यांना या मोफत सेवेचा लाभ देणेत येत नाही. वस्तुत: कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे मानधन, रोजंदारी, बदली कर्मचारी हे महापालिकेची प्रामाणिकपणे सेवा बजावत असलेने, सदर कर्मचाऱ्यांना व त्यांचेवर अवलंबून असणारे आई-वडील, पती/पत्नी व विना लग्नाचे अपत्य यांना महापालिकेच्या वैद्यकीय केंद्र, आरोग्य केंद्र, प्रसुतीगृह, कुटूंब कल्याण केंद्र, शहर आरोग्य केंद्र, मध्यवर्ती निदान केंद्र, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल इत्यादी मध्ये देणेत येणाऱ्या सुविधांचा लाभ मोफत देणेस ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२ **दिनांक :- १६/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिकेच्या बेडग रोड येथे कचरा डेपो असून, सदर डेपोवर महापालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाची स्थल पहाणी महापालिकेचे सर्व अधिकारी व प्रसिद्धी माध्यमाचे प्रतिनिधी यांचे समवेत करणेत आली. स्थल पहाणी अंती खालील प्रमाणे वस्तुस्थिती दिसून आली.

सदर कचरा डेपोवर साठलेल्या सर्व कचऱ्यांचे घनकचरा व्यवस्थापनांतर्गत नियुक्त केलेल्या ठेकेदार कंपनीने शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावलेली असून, सदर कचरा डेपोमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिकामी झालेली आहे. तसेच, कचरा डेपोमध्ये रिकाम्या झालेल्या भागामध्ये कॉंक्रिटीकरणाचे काम चालू आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापनांतर्गत दैनंदिन येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी नविन मशिनरी बसविणेत आलेल्या आहेत. कचरा डेपोमध्ये मुरुमीकरण, अंतर्गत रस्ते व कचरा डेपोला कंपौंड भिंत बांधणेचे काम प्रगती पथावर आहे. बेडग रोड कचरा डेपो मध्ये वर्षानोवर्षे साठलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली असल्यामुळे सदर कचरा डेपोमध्ये व परिसरामध्ये फार मोठा बदल झालेला असून, सदर परिसर प्रदुषण मुक्त झालेला आहे व महापालिकेच्या वतीने सदर ठिकाणी वृक्षारोपणाचे नियोजन केलेले आहे. तसेच, भविष्यात सदर कचरा डेपोतील कचऱ्यापासून खत,गॅस व इलेक्ट्रीसिटी निर्माण करणेचे नियोजन असलेबाबत ठेकेदार कंपनीचे संचालक यांनी विदीत केले असून, त्यानुसार आरोग्य विभागाने पुढील योग्यती कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका